सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना समन्वय समिती दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी देशव्यापी लाक्षणिक संपाबाबत करावयाची कार्यवाही.....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र:- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४९९/१६/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-३१ ऑगस्ट, २०१६.

## परिपत्रक

अकरा केंद्रीय कर्मचारी संघटनांनी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी देशव्यापी लाक्षणिक संप पुकारलेला आहे. त्यास अनुसरुन राज्यातही सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना समन्वय समिती यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यासंदर्भात दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी देशव्यापी लाक्षणिक संपात सहभागी होण्याची नोटीस शासनास दिली आहे. सदर संपामध्ये राज्य शासकीय निमशासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांसोबत स्वायत्त संस्थेच्या इतर संघटनांचे सदस्यही सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. दिनांक ०२ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या संप काळात कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व अकृषि विद्यापीठांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत:-

अ) विद्यापीठीय शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यांना संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विलाबिलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचारी यांच्या व्यक्तीश: निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत विद्यापीठाच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यांना संपात भाग न घेण्याविषयी व नेहमी प्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकाऱ्यांकडे द्यावी. गरज भासल्यास गृहरक्षक/पोलीस दलाची मदत घ्यावी.

ड) विभाग प्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जाऊ नये.

इ) विभाग प्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यंत कोणत्याही विद्यापीठीय शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे त ठरवावे.

ई) विद्यापीठीय शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे "काम नाही वेतन नाही" हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यांना अवगत करावे.

३. सदर संपाच्या दिवशी कार्यालयात उपस्थित असलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहरत प्रपत्रात कळवावी व संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व विद्यापीठांची संकलित माहिती दिनांक ०२ सप्टेंबर, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात कार्यासन विशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(हर्षवर्धन तु. जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
४. निवड नस्ती.

---

Estd-1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF -28th Rank

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण–2016/प्र.क्र.499/16/विशि–1 दिनांक 31/08/2016 रोजीचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.

उपकुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 3308

दिनांक : 1 SEP 2016

प्रति.

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
4. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, कुलसचिव, संचालक, बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
5. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक INTRA NET वर प्रसिध्द करावे.